RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ५३] बुधवार, एप्रिल २८, २०२१/वैशाख ८, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

१० वा मजला, गो. ते. रुग्णालय, संकुल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २८ एप्रिल २०२१

### अधिसूचना

**जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक जमृनों-२०२०/७२४/प्र.क्र. ३२६/कु.क..— जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) च्या कलम ३० चे उप-कलम (२) च्या खंड (ख) आणि कलम १४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन केंद्र शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० मध्ये याद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या नियम १० मधील उप-नियम (१) च्या परंतुकामध्ये "(एक) जर त्यांची नोंदणी " या वाक्यापासून सुरू होणाऱ्या व " अधीन राहून निबंधक " या वाक्याच्या ठिकाणी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढीलप्रमाणे बदल समाविष्ट करण्यात येत आहे.—

" जर त्यांची नोंदणी,—

(एक) जन्म व मृत्यू नोंदणी नियम, २००० च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी जर नोंदणी केली असेल तर महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ प्रसिद्ध करण्याच्या वेळी ज्या प्रकरणांना पंधरा वर्ष पूर्ण झालेली आहेत अशा प्रकरणांसाठी आणखी पाच वर्षांचा कालावधी देण्यात येईल, किंवा

(दोन) महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०२१ च्या प्रारंभाच्या दिनांकानंतर जर नोंदणी केली असेल तर कलम २३ च्या उप-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीन राहून अशा नोंदणीच्या दिनांकापासून निबंधक,— "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे उप सचिव.

**PUBLIC HEALTH DEPARTMENT**

10th Floor, G. T. Hospital, Complex Building,
New Mantralay, Mumbai 400 001, dated the 28th April 2021

*NOTIFICATION*

REGISTRATION OF BIRTH AND DEATHS ACT, 1969.

No. JAMRUNO-2020/724/C.R.326/F.W.—In exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section (*2*) of section 30 read with section 14 of the Registration of Births and Deaths Act, 1969 (18 of 1969), the Government of Maharashtra with the approval of the Central Government, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Deaths (Amendment) Rules, 2021.

2. In rule 10 of the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000 in sub-rule *(1)*, in the proviso, for the portion beginning with the words "which shall be reckoned" and ending with the words " the Registrar shall " the following shall be substituted, as follows, namely :–

"which shall be reckoned,–,

(*i*) in case where the registration has been made prior to the date of commencement of the Registration of Births and Deaths Rules, 2000, further five years period shall be given, in respect of those cases, where fifteen years period has been completed at the time of publication of the Maharashtra Registration of Births and Death (Amendment) Rules, 2021, or

(*ii*) in case where the registration is made after the date of commencement of the Maharashtra Registration of Births and Deaths (Amendment) Rules, 2021 from, the date of such registration, subject to the provisions of sub-section *(4)* of section 23, and the Registrar shall,–"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. M. BHAROSE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.